Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Fax : 25665807 । Secretary(P) : 25651750

जा. क्र.रा.म./परीक्षा-६/३१९२
दिनांक - २४/०७/२०२०

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई-४०००३०
४) मा. संचालक,आकाशवाणी,मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन,बॅकबे रेक्लेमेशन,आमदार निवासाजवळ,मुंबई-४०००२०
५) मा. संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्रे

विषय- : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षेपासून गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांची छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन प्रकिया सुरू करण्याबाबत...

महोदय,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षेपासून ऑनलाईन निकाल जाहिर झाल्यानंतर गुणपडताळणी, उत्तरपत्रिकाची छायांकित प्रत देणे व पुनर्मुल्यांकन तसेच स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी मंडळामार्फत ऑनलाईन प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासु,

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण त्यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द् करावे. व सर्व मान्यताप्राप्त शाळांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ,पुणे
३) अस्वीस, राज्यमंडळ, पुणे
४) ग्रंथालय, राज्यमंडळ, पुणे
५) ऑनलाईन विभाग

प्रत माहितीसाठी सविनय सादर -

१) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२) मा. खाजगी सचिव, मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
३) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

**विषय :** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षेपासून गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांची छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरू करण्याबाबत...

## प्र क ट न

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा दिनांक ०३ मार्च २०२० ते २३ मार्च २०२० व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा दिनांक १८ फेब्रुवारी २०२० ते १८ मार्च २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

सदर परीक्षांचा ऑनलाईन निकाल नजीकच्या काळात जाहीर करण्यात येणार आहे. मंडळाच्या प्रचलित पध्दतीनुसार ऑनलाईन निकालानंतर गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी विद्यार्थी स्वत: किंवा शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेमार्फत मंडळामध्ये समक्ष जावून अर्ज सादर करतात. तथापि सद्य:स्थितीमध्ये राज्यात कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे व राज्यात संचारबंदी असल्याने विद्यार्थी/ पालक यांना विभागीय मंडळामध्ये जाणे गैरसोयीचे असल्याने तसेच विभागीय मंडळामध्ये होणारी गर्दी टाळणे आवश्यक असल्याने ऑनलाईन निकालानंतर करण्यात येणाऱ्या गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी फेब्रुवारी-मार्च २०२० च्या परीक्षेपासून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. सदर प्रक्रिया संबंधित परीक्षांचे **ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासून** सुरु करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती, पुनर्मुल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी अर्ज करावयाचे आहेत. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) साठी http://verification.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावर **ऑनलाईन पध्दतीनेच** अर्ज करावयाचे आहेत. यासाठी भरावयाचे विहित शुल्क, अटी/शर्ती व सूचना उपरोक्त नमूद संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या प्रक्रियेसाठीचे **विहित शुल्क Debit Card/Credit Card/UPI/Net Banking** याव्दारे ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहे.

तरी, उपरोक्त बाबीची नोंद मुख्याध्यापक/प्राचार्य/विद्यार्थी/पालक/शिक्षक व संबंधित घटकांनी घ्यावी.

दिनांक - १५/०७/२०२०

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४